लोकनिष्ठ

LOK NISHT

● Daily ● Aurangabad ● Vol. 1 ● Issue 3 ● Tuesday, 30 MAY 2023 ● Pages - 4 ● Price 2.00 Rs.

● दैनिक ● औरंगाबाद ● वर्ष १ ● अंक ३ ● मंगळवार दि. ३० मे २०२३ ● पाने – ४ ● किंमत २.०० रू.

Title-Code - MAHMAR52309

# नवीन संसद भवन हे भारतीयांच्या आकांक्षा आणि स्वप्नांचे प्रतिबिंब–पंतप्रधान नरेंद्र मोदी

## नव्या संसद भवनाच्या इमारतीत श्रमिकांचे योगदान अमर होण्याची ही पहिलीच वेळ आहे

**नवी दिल्ली** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज संसदेची नवी इमारत देशाला अर्पण केली. दिवसाच्या सुरुवातीलाच, पंतप्रधानांनी नव्या संसद भवनामध्ये नंदीचे शिल्प असलेल्या सेंगोल अर्थात राजदंडाची पूर्व–पश्चिम दिशेकडे स्थापना केली. त्यांनी याप्रसंगी दीपप्रज्वलन देखील केले आणि राजदंडाला पुष्पे अर्पण केली. या प्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले की प्रत्येक देशाच्या इतिहासात असे काही क्षण असतात जे अमर होऊन राहतात. काही तारखा काळाच्या प्रवाहात अमरत्वाचा आशीर्वाद प्राप्त करतात आणि २८ मे २०२३ ही अशीच एक तारीख आहे असे ते म्हणाले. भारताच्या जनतेने अमृत महोत्सवानिमित्त स्वतःलाच दिलेला ही भेट आहे,त्यांनी सांगितले. पंतप्रधानांनी या वैभवशाली प्रसंगी देशातील प्रत्येल व्यक्तीचे अभिनंदन केले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की नवीन संसद भवन ही केवळ एक इमारत नाही तर ते १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षा आणि स्वप्नांचे ते प्रतिबिंब आहे. हे आपल्या लोकशाहीचे मंदिर असून ते भारताच्या निश्चयाचा संदेश जगाला देत आहे, त्यांनी पुढे सांगितले, नवीन संसद भवनाची इमारत नियोजनाला वास्तवाशी, धोरणांना प्रत्यक्ष परिस्थितीशी, इच्छाशक्तीला अंमलबजावणीशी आणि संकल्पाला सिद्धतेशी जोडते. आपल्या स्वातंत्र्य सैनिकांचे स्वप्न प्रत्यक्षात साकार करण्याचे हे माध्यम असेल.ही इमारत आत्मनिर्भर भारताच्या उदयाची साक्षीदार असेल आणि विकसित भारत वास्तवात उतरविण्याचे काम ती पूर्ण करेल. पंतप्रधान म्हणाले की ही नवी इमारत म्हणजे प्राचीनता आणि आधुनिकता यांच्या सह–अस्तित्वाचे उत्तम उदाहरण आहे.

नवीन भारत नवी उद्दिष्ट्ये साध्य करत असून नव्या मार्गांची उभारणी करत आहे यावर भर देत पंतप्रधान मोदी म्हणाले, नव्या मार्गांचा स्वीकार करूनच नव्या गोष्टींची उभारणी करता येते. देशात आता नवी उर्जा, नवा जोम,नवी उत्सुकता, नवी विचारधारा आणि नवा प्रवास यांची सुरुवात होते आहे. आपल्यामध्ये नवी दृष्टी, नव्या दिशा,नवे निर्धार आणि नवा विश्वास निर्माण होत आहे,ते उद्गारले. पंतप्रधान म्हणाले की, सारे जग आता भारताचा



निर्धार, भारतीयांचे सामर्थ्य आणि भारतातील मनुष्यबळाचे जीवन यांकडे अधिक आदराने आणि आशेने पाहत आहे. जेव्हा भारत प्रगती करतो तेव्हा संपूर्ण जग प्रगती करते, ते म्हणाले. नवीन संसद भवन भारताच्या विकासातून जगाच्या विकासाला चालना देईल ही बाब त्यांनी अधोरेखित केली.

पवित्र सेंगोलच्या स्थापनेचा संदर्भ देत पंतप्रधान म्हणाले की महान चोल साम्राज्याच्या काळात सेवा, कर्तव्याचा मार्ग आणि देश यांचे प्रतिक म्हणून सेंगोलकडे पाहिले जात होते. राजाजी आणि आधिनम यांच्या मार्गदर्शनाखाली हा पवित्र सेंगोल सत्तेच्या हस्तांतराचे प्रतीक बनला. नवीन संसद भवनाच्या उदघाटनप्रसंगी आशीर्वाद देण्यासाठी आज सकाळी उपस्थित असलेल्या आधिनम संतांना पंतप्रधानांनी पुन्हा एकदा अभिवादन केले. या पवित्र राजदंडाचा सन्मान आपण पुनर्प्रस्थापित करू शकलो हे आपले भाग्यच आहे. संसद भवनातील कार्यादरम्यान हा राजदंड आपल्याला प्रेरित करत राहील, ते म्हणाले.

भारत हा फक्त लोकशाहीवादी देश नाही तर भारतमाता ही लोकशाहीची जननी आहे, असे पंतप्रधान म्हणाले. जागतिक लोकशाहीसाठी राष्ट्र हा मूलभूत पाया आहे, असे त्यांनी सांगितले. भारतात लोकशाही ही फक्त एक व्यवस्था, प्रणाली म्हणून रूजलेली नाही तर ती संस्कृती, विचारप्रक्रिया आणि परंपरा आहे, असे त्यांनी नमूद केले. वेद आपल्याला लोकशाही सभा आणि समित्यांची तत्वांची शिकवण देतात असे त्यांनी वेदांचा संदर्भ देत सांगितले. महाभारतात प्रजासत्ताकाचे वर्णन सापडते आणि वैशालीत भारत लोकशाही जगला आणि तिथे भारताने लोकशाही अनुभवल्याचा उल्लेख त्यांनी केला. भगवान बसवेश्वरांचे अनुभव मंटप्पा ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे, असे मोदी पुढे म्हणाले.इ.स. ९०० मधील तामिळनाडूमध्ये सापडलेल्या शिलालेखांविषयी पंतप्रधान बोलले. आजच्या काळात आणि युगातही हे शिलालेख सर्वांना आश्चर्यचकित करतात असे मोदी म्हणाले.आपली लोकशाही हीच आपली प्रेरणा आहे आणि आपली राज्यघटना हाच आपला संकल्प आहे.ही प्रेरणा, या संकल्पाचा सर्वात मोठा प्रतिनिधी आपली संसद आहे, असे मोदी यांनी नमूद केले. जे पुढे जाणे थांबवतात त्यांना दैवही साथ देत नाही, परंतु जे पुढे जात राहतात त्यांचा भाग्योदय होतो असे एका श्लोकाचा दाखला देत पंतप्रधानांनी सांगितले.

कित्येक वर्षांच्या गुलामगिरीनंतर, कितीतरी गमावल्यानंतर भारताने आपला प्रवास पुन्हा सुरू केला आणि तो अमृतकालापर्यंत पोहोचला, असे त्यांनी सांगितले. अमृतकाल म्हणजे आपला वारसा जपतानाच विकासाची नवी उंची गाठण्यासाठीचा काळ आहे. या काळात देशाला नवी दिशा देण्याचा हा अमृत काळ आहे. असंख्य आशाआकांक्षाची पूर्तता करण्याचा हा अमृत काल आहे. असे त्यांनी सांगितले. लोकशाहीसाठी नवसंजीवनीची गरज असल्याचे त्यांनी एका श्लोकाद्वारे सांगितले. लोकशाहीचे कार्यस्थळ म्हणजेच संसद ही नवीन आणि आधुनिक असायला हवी यावर पंतप्रधानांनी भर दिला.

भारतातील समृद्धी आणि वास्तुकलेच्या सुवर्णकाळाचे स्मरण त्यांनी केले. शेकडो वर्षांच्या गुलामगिरीने आपले हे वैभव हिरावून घेतले, असे ते म्हणाले. २१व्या शतकातील भारताकडे मोठ्या प्रमाणात आत्मविश्वास असल्याचे त्यांनी नमूद केले.आजच्या भारताने गुलामगिरीची मानसिकता सोडून कलेच्या त्या प्राचीन वैभवाकडे पुन्हा वळला आहे. नवीन संसद भवन हे या प्रयत्नाचे मूर्तिमंत उदाहरण आहे. या वास्तूमध्ये वारसा तसेच स्थापत्य, कला तसेच कौशल्य, संस्कृती तसेच संविधानाचे स्वरही आहेत., असे पंतप्रधान म्हणाले. लोकसभेत राष्ट्रीय पक्षी मोर तर राज्यसभेत राष्ट्रीय फूल कमळावर आधारित संकल्पनेवर अंतर्गत सजावट केली आहे. संसदेच्या आवारात वटवृक्ष हा आपला राष्ट्रीय वृक्ष आहे. नवीन इमारतीमध्ये देशाच्या विविध भागांतील वैशिष्ट्यांचा अंतर्भाव केला आहे. राजस्थानमधील ग्रॅनाइट, महाराष्ट्रातील लाकूड आणि भधोई कारागिरांनी तयार केलेल्या गालिच्याचा वापर सजावटीसाठी केल्याची माहिती पंतप्रधानांनी केली.

# कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास तात्काळ तातडीने ३० हत्यारबंद पोलिस पोहचणार-पोलीस आयुक्तांची माहिती

**औरंगाबाद (प्रतिनिधी)** - मार्चमध्ये किराडपुरा भागात झालेल्या हिंसाचाराच्या घटनेनंतर जिल्ह्यातील अनेक भागात छोट्या-मोठ्या वादाच्या घटना समोर आल्या आहेत. दरम्यान या सर्व पार्श्वभूमीवर शहरात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही यासाठी पोलीस आयुक्त मनोज लोहिया यांनी वेगवेगळ्या उपाययोजना सुरु केल्या आहेत. याचाच एक भाग म्हणजे आता शहरात कुठेही तणावाचे वातावरण निर्माण झाल्यास तत्काळ घटनास्थळी ३० हत्यारबंद पोलिसांना पाचारण करून बंदोबस्त सज्ज ठेवण्यात येणार आहेत.

पोलिस आयुक्त मनोज लोहिया यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना म्हटले आहे की, शहरातील कोणत्याही पोलिस ठाण्याच्या हद्दीत कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास तेथील पोलिस दलाच्या मदतीला तातडीने ३० हत्यारबंद पोलिस सज्ज ठेवण्यात येणार आहेत. त्यासाठी संबंधित पोलिस ठाण्यांत स्पेशल रूम, पोलिसांच्या वाहनांमध्ये अधिकारी-कर्मचारी तैनात ठेवण्याचे नियोजन केल्याची माहिती पोलिस आयुक्त मनोज लोहिया यांनी दिली आहे.

पोलिस आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर लोहिया यांनी शहरातील पोलिस दलात अनेक बदल



करायला सुरवात केली आहे. तसेच वेगवेगळ्या उपाययोजनांवर देखील भर दिला आहे. त्याचाच एक भाग म्हणजे शहर पोलीस दलातील प्रत्येक विभागप्रमुख आणि पोलीस ठाणेप्रमुख यांना विशेष मोबाईल क्रमांक देण्यात आले आहेत. तसेच पोलीस अधिकारी बदलले तरीही मोबाईल क्रमांक मात्र कायम राहणार आहे. सोबतच एखादी घटना घडल्यानंतर तेथे तत्काळ पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांची मदत मिळणार आहे. तसेच शहरात कुठेही तणावाचे वातावरण निर्माण झाल्यास तत्काळ घटनास्थळी ३० हत्यारबंद पोलिसांना पाचारण करून बंदोबस्त सज्ज ठेवण्यात येणार आहेत. सोबतच शहरातील ३४ ठिकाणी कायमस्वरूपी पोलिस तैनात असणार आहेत. त्यामुळे आता नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल, अशी अपेक्षा पोलीस आयुक्तांनी व्यक्त केली आहे. शिवाय शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढवण्यासाठीही प्रयत्न सुरू असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

**पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्याची चर्चा...** पोलिस आयुक्त मनोज लोहिया यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अनेक बदल सुरु केले आहेत. सुरवातीला अनेक प्राथमिक बदल केल्यावर आता पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या होणार असल्याची देखील चर्चा आहे. तसेच काही ठाणे प्रमुखांचे खांदेपालट होणार असल्याची देखील शक्यता आहे. त्यामुळे बदल्यांचा बॉम्ब कधी फुटणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहेत. तर काही अधिकारी आत्तापासूनच आपापल्या पद्धतीने जुगाड लावत असल्याची देखील चर्चा आहे.

# कीर्तनकारास धमकी देणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

**औरंगाबाद (प्रतिनिधी)** - औरंगाबादच्या एका वयोवृध्द कीर्तनकारास धमकी देणाऱ्या दोघांविरोधात शहरातील वाळूज पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मला ३० हजार रुपये द्या अन्यथा तुमचे फोटो इतरांना दाखवून समाजात तुमची बदनामी करीन, अशी धमकी कीर्तनकारास देण्यात आली होती. दरम्यान सततच्या या धमकीला कंटाळून कीर्तनकाराने पोलिसात धाव घेतली होती. त्यानंतर वाळूज पोलीसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गंगापूर तालुक्यातील मांगेगाव येथील कीर्तनकार अंबादास गावंडे हे सध्या वाळूजला आपल्या कुटंबासह राहतात. तर मृदंगवादक ज्ञानेश्वर सुलाने (रा. बजाजनगर, वाळूज) यांच्या मध्यस्थीने कीर्तनकार गावंडे अनेक ठिकाणी कीर्तनातून प्रबोधन करण्याचे काम करतात. विशेष म्हणजे सुलानेबरोबर चांगल्या प्रकारचे ओळखीचे सबंध झाल्याने सदर कीर्तनकारांनी त्याला आपल्या घरीही अनेकवेळा आणलेले होते. अशातच १३ मे रोजी सुलाने यांनी मला वृंदावनला जायचे असल्याने अंबादास महाराज यांना ३० हजारांची मागणी केली होती.



दरम्यान त्यानंतर मांगेगाव येथेही जाऊन अशोक गावंडे यांच्या संगतीने पुन्हा १५ मे रोजी वरील प्रकारची धमकी दिल्याचे गावंडे यांनी सदर कीर्तनकाराला कळविले. गेल्या १५ मे पासून पैसे दे अन्यथा बदनामी करील अशी सुलाने सतत धमकी देत होता. तसेच त्यांचे कोणते फोटो आहेत हे किर्तनकारालाही माहिती नाही. त्यामुळे त्रास असहय्य झाल्याने अखेर कीर्तनकार अंबादास मारुती गावंडे यांनी ज्ञानेश्वर सुलाने (रा.सासेगाव, ता. कन्नड ह. मु. बजाजनगर) अशोक बारकु गावंडे (रा. मांगेगाव) या दोघाच्या विरोधात वाळूज पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून पोलिसांनी वरील दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. मला ३० हजार रुपये द्या अन्यथा तुमचे फोटो इतरांना दाखवून समाजात तुमची बदनामी करीन, अशी धमकी कीर्तनकारास देण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. दरम्यान यामुळे तो फोटो नेमका कोणाचा आणि त्यात काय आहे अशी देखील चर्चा या मुळे शहरात होऊ लागली आहे. तर या फोटोबाबत आपल्याला देखील काहीही माहित नसल्याचं कीर्तनकार यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. त्यामुळे पोलीस तपासातच या सर्व गोष्टी स्पष्ट होणार आहे.

# मी अजून शिक्षकी पेशा स्विकारलेला नाही - अजित पवारांचा चिमटा



**पुणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला नऊ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला आहे.त्यावरून विरोधक विविध मत व्यक्त करीत आहेत.तर तुम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीला ९ पैकी किती मार्क देताल. त्या प्रश्नावर अजित पवार म्हणाले की, मी अजून शिक्षकी पेशा स्विकारलेला नाही.

त्यामुळे मला मार्क वैगरे देता येणार नाहीत. ते मिडियाने शोधले पाहिजे. नऊ वर्षामध्ये काय झाले. २०१४ मध्ये काय सांगितले होते. पेट्रोल, डिझेल, गॅस सिलेंडरच्या काय किंमती होत्या. बेकारी किती होती. या सर्व गोष्टीच आत्मचिंतन आपणच करून जनते समोर ठेवावे अशी भूमिका यावेळी त्यांनी मांडली.

# भाजपा सरकार ९ वर्षात सर्व आघाड्यांवर अपयशी, पी. चिदंबरम यांची टीका; म्हणाले, २ हजारांची नोट

**पुणे** – केंद्रातील भाजपा सरकारने ९ वर्ष पूर्ण केली असून या ९ वर्षात हे सरकार सर्व आघाड्यांवर पूर्णपणे अपयशी ठरलेले आहे. धर्मनिरपेक्ष, लोकशाही देशामध्ये शासन आणि धोरणे सर्वांचा विकास करणारी असायला हवीत. परंतु, गेल्या नऊ वर्षांत एनडीए सरकारने त्यासाठी काहीही केलं नाही. केंद्र सरकार आपल्या चुका सुधारून जनतेसाठी सुशासन करण्याचा प्रयत्नही करत नाही हे अत्यंत वाईट आहे, असा घणाघाती हल्ला माजी केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी केला.

मोदी सरकारला ९ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने कॉंग्रेसने देशभरातील प्रमुख शहरात पत्रकार परिषदा घेऊन केंद्र सरकारची पोलखोल केली. टिळकभवन येथे पी. चिदंम्बरम यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केलं. देशाचा कारभार संविधानानुसार चालतो की नाही अशी चिंता वाढत आहे. केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यातील दरी वाढत असून ही आणखी एक चिंतेची बाब आहे. राज्य सरकारांच्या कार्यकारी अधिकारांमध्ये कपात करण्यात आली आहे. बिगर भाजपशासित राज्यांचे राज्यपाल व्हाईसरॉयसारखे वागत आहेत, अशी टीका चिदंबरम यांनी केली.

**लोकशाहीचे स्वतंत्र आधारस्तंभ असलेल्या संस्था** – संसदीय नियम आणि कायद्यांचे उल्लंघन केलं जात आहे. खोट्या केसेस, तपासाच्या धमक्या देऊन राज्य सरकारांना अस्थिर करण्यासाठी केंद्र सरकारच्या तपास यंत्रणा तैनात करण्यात आल्या आहेत. लोकशाहीचे स्वतंत्र आधारस्तंभ असलेल्या



संस्था केंद्र सरकारने कमकुवत केल्या आहेत. मोदी सरकारच्या काळात लोकशाहीचा हा वटवृक्ष पोकळ झाला आहे, असेही चिदंबरम यांनी सांगितलं.

**जून २०२० मध्ये गलवान खोऱ्यात झालेल्या चकमकींपासून** – संरक्षण व परराष्ट्र धोरणांवरही केंद्र सरकार अपयशी ठरले आहे. पाकिस्तान, चीन, बांग्लादेश, श्रीलंका या शेजारी देशांशी आपले संबंध चांगले राहिले नाहीत. चिनी सैन्याने भारताच्या ताब्यातील भूभागात अतिक्रमण केले आहे आणि आजही ते व्यापलेले आहे, याचे भरपूर पुरावे आहेत. चिन सीमाभागात संरक्षण पायाभूत सुविधा वाढत आहे. तसेच सीमेवर नवीन वसाहती उभारत आहे. जून २०२० मध्ये गलवान खोऱ्यात झालेल्या चकमकींपासून भारतीय गस्त घालण्याचे प्रमाण कमी झाले आहे, असं चिदंबरम यांनी म्हटलं.


**मणिपूर जळत असताना पंतप्रधान व गृहमंत्री** – तर दुसरीकडे चीन-पाकिस्तानची युती मजबूत झाली आहे आणि सुरक्षेचा धोका पश्चिम, उत्तर आणि पूर्वेकडील सीमेच्या प्रत्येक भागात पसरला आहे. असे असतानाही संसदेला अंधारात ठेवले आहे. मागील तीन वर्षात देशाच्या सुरक्षेच्या धोक्यांवर संसदेत चर्चा होऊ दिली नाही. मणिपूरम धील चिंताजनक परिस्थिती असून ७५ हून अधिक मृत्यू झाले असतानाही पंतप्रधानांचे सततचे मौन गंभीर आहे. मणिपूर जळत असताना पंतप्रधान व गृहमंत्री कर्नाटकच्या निवडणुक प्रचारात व्यस्त होते, असं टीकास्त्र चिदंबरम यांनी डागलं.

**दोन हजाराची नोट चलनात आणणे**

अर्थव्यवस्थेचा वेग अत्यंत कमी आहे. प्रचंड बेरोजगारी, सततची महागाई, वाढती असमानता हा ज्वलंत विषय आहे. बेरोजगारीचा दर सध्या ७.४५ टक्के आहे. दोन हजार रुपयांच्या नोटा सामान्य जनतेच्या गरजेच्या नव्हत्या. दोन हजाराची नोट चलनात आणणे आणि परत घेण्याच्या भयंकर तमाशाने भारताच्या चलनाच्या अखंडतेवर आणि स्थिरतेवर शंका निर्माण केली आहे, हा निर्णय मुर्खपणाचा आहे. सध्याची परिस्थिती २००४ ते २००९ मधील तेजीच्या वर्षांच्या ९ टक्के वाढीच्या सरासरीपेक्षा खूप दूर आहे, असेही चिदंबरम म्हणाले.

# 'हनी ट्रॅप' प्रकरणात अटक केलेले 'डीआरडीओ'चे संचालक डॉ. कुरुलकर यांच्या न्यायालयीन कोठडीत वाढ

**पुणे** : 'हनी ट्रॅप' प्रकरणात अटक केलेले संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे (डीआरडीओ) संचालक, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप कुरुलकर यांच्या न्यायालयीन कोठडीत वाढ करण्याचे आदेश विशेष न्यायाधीश एस. आर. नावंदर यांनी सोमवारी दिले. त्यानुसार विशेष न्यायालयाने डॉ. कुरुलकर यांना १२ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.



विशेष न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार डॉ. कुरुलकर यांची येरवडा कारागृहातील विशेष कक्षात रवानगी करण्यात आली आहे. सोमवारी (२९ मे) कुरुलकर यांच्या न्यायालयीन कोठडीची मुदत संपली. कुरुलकर यांना विशेष न्यायालयात प्रत्यक्षात हजर केले करण्यात आले नाही. त्यांच्या न्यायालयीन कोठडीत चौदा दिवस वाढ करण्याचे आदेश विशेष न्यायालयाने दिले.

डॉ. कुरुलकर यांनी पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेतील (पीआयओ) हेरांना संवेदनशील माहिती तसेच छायाचित्रे इ-मेलद्वारे पाठविल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे. गेल्या वर्षी डॉ. कुरुलकर यांनी सहा देशांना भेटी दिल्या होत्या. शासकीय पारपत्राचा वापर करुन ते परदेशात गेले होते. परदेशात पाकिस्तानी हेरांना भेटल्याचा संशय राज्य दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) व्यक्त केला आहे. पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेने डॉ. कुरुलकर यांना मधू मोहजालात (हनी ट्रॅप) अडकवून त्यांच्याकडून संवेदनशील माहिती मिळवल्याचा संशय असून त्यांची पॉलिग्राफ चाचणी करण्यात येणार आहे.

मात्र, पॉलिग्राफ चाचणीबाबत अद्याप एटीएसने कोणताही अर्ज अद्याप न्यायालयात अर्ज दाखल केला नाही. कुरुलकर यांना पाकिस्तानातून काही इ-मेल पाठविण्यात आले आहे. त्यांनी इ-मेलला प्रतिसाद दिला आहे. त्यांनी पाकिस्तानातील आयपी ॲड्रेसवर मेल केल्याची माहिती गुगलने दिलेल्या अहवालातून उघड झाली आहे. त्यांच्याकडून जप्त करण्यात आलेल्या लॅपटॉप आणि मोबाइल संचाचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले असून याबाबतचा अहवाल एटीएसला मिळाला आहे.

# महामेट्रोला दुसऱ्या टप्प्याची धाकधूक! पुढील नियोजन बिघडण्याची भीती

**पुणे** : महामेट्रोकडून पुणे मेट्रोच्या पहिल्या टप्प्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. त्याच वेळी महामेट्रोने दुसऱ्या टप्प्याची तयारी केली. महामेट्रोने दुसऱ्या टप्प्याचा प्रकल्प विकास आराखडा महापालिकेला आठ महिन्यांपूर्वी सादर केला. अद्याप त्याला महापालिकेने मंजुरी दिलेली नाही. यामुळे महामेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला विलंब होऊन पुढील नियोजन बिघडण्याची भीती महामेट्रोला वाटत आहे.

मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रकल्प विकास आराखडा २६ सप्टेंबर २०२२ रोजी महामेट्रोने पुणे महापालिकेकडे सादर केला. त्यानंतर महापालिकेने त्यामध्ये काही शंका उपस्थित केल्या. त्या संदर्भात महामेट्रो आणि महापालिका यांच्यात अनेक बैठका झाल्या. महापालिकेने प्रकल्प विकास आराखडा मंजूर करून लवकरात लवकर राज्य सरकारकडे पाठवायला हवा होता. त्यानंतर राज्य सरकारने तो केंद्र सरकारकडे पाठवला असता आणि अंतिम मंजुरी मिळाली असती. परंतु, आठ महिने उलटूनही प्रकल्प विकास आराखडा महापालिकेतून पुढे सरकला नाही. केवळ त्याला तत्त्वत: मान्यता देण्यात आली आहे.

१९९४ पासून साप्ताहिक **भाग्यचक्र** आपल्या सेवेत कायम राहिले. **भाग्यचक्र** चे संस्थापक संपादक **स्व. जी.एम. खान** यांनी वृत्तपत्र क्षेत्रात मोठी कामगिरी बजातांना त्यांनी सामाजिक कार्य करत व जनसामान्यांच्या समस्या वृत्तपत्राच्यामाध्यमातून शासन आणि प्रशासना पर्यंत पोहचवण्याच्या दृष्टीकोणातून **भाग्यचक्र** या वृत्तपत्राची सुरुवात केली होती. त्यांच्या उपरांत **युनूस खान** यांनी भाग्यचक्राची धुरा आपल्या हाती घेत या वृत्तपत्रास शिखरावर नेले. सा. **भाग्यचक्र** च्या यशस्वी वाटचालीनंतर व संस्थापक संपादकांची विचारसरणी पुढे नेत दैनिक **लोकनिष्ठ**ची सुरुवात केली. आपण आतापर्यंत दिलेला प्रेम व सहकार्य यापुढे ही असाच देत रहावा, हीच अपेक्षा...

–**युनूस खान** (संपादक)

## संपादकीय

# भारत अन्नधान्य उत्पादनात पहिल्या पाच क्रमांकात ...

एका बाजूला यंदा होणारे अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन आणि दुसऱ्या बाजूला जगातील १२१ विकसनशील देशांच्या भूक निर्देशांकात १०१ वरून १०७व्या क्रमांकावर झालेली घसरण सावरण्याची चिंता, या दोन परस्परविरोधी गोष्टींचा अन्वयार्थ लावणे हे देशासमोरील सर्वात मोठे आव्हान ठरणार आहे. कागदोपत्री पुरेसे धान्य निर्माण झाले असले, तरी ते या देशातील प्रत्येक नागरिकाच्या पोटात जाऊ शकत नाही. या वस्तुस्थितीकडे जोवर धोरणकर्त्यांचे दुर्लक्ष होईल, तोवर हा विरोधाभास राहणार. देशात कोणत्या धान्याची नेमकी गरज किती असते, हे जाहीर करणे सरकारच्या कृषी खात्याला सहज शक्य आहे. ते होत नाही, त्यामुळे प्रत्येक शेतकरी आपापल्या हिशोबाने हव्या त्या शेतमालाला प्राधान्य देतो. त्यामुळे काही बाबतीत देश गरजेपेक्षा अधिक उत्पादन करतो, तर काही शेतमालाची मोठ्या प्रमाणावर आयात करणे भाग पडते. कृषी धोरण आखताना शेतकऱ्यांना विश्वासात घेतले न गेल्यामुळे ही स्थिती उद्भवते. देशात यंदा विक्रमी म्हणजे ३३०.५ दशलक्ष टन अन्नधान्य उत्पादन झाल्याचा अंदाज केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांच्या कठोर मेहनतीचे हे फळ आहे, या कष्टाचा अभिमान प्रत्येक भारतीयाने बाळगलाच पाहिजे. मात्र शेतमालाचे विक्रमी उत्पादन होऊनही शेतकऱ्यांच्या पदरात फार काही पडत नाही. शेतमालाच्या निर्यातीला मिळणारी नकारघंटा आणि त्याच्या विक्री व्यवस्थेतील अनंत अडचणी या सरकारी धोरणातील घोटाळ्यांमुळे हे घडून येते एवढाच याचा अर्थ.

देशात यंदा मागील वर्षापेक्षा सुमारे पंधरा लाख टन अधिक अन्नधान्य उत्पादन झाले. यंदा तांदळाचे १३५.५ दशलक्ष टन उत्पादन झाले आहे, जे मागील वर्षापेक्षा ६७ लाख टनांनी जास्त आहे. गव्हाच्या उत्पादनात ५० लाख टनांची वाढ होऊन ते ११२.७ दशलक्ष टन झाले आहे. वाढीचा असाच कल तेलबिया, तृणधान्ये आणि डाळींबाबत दिसून येतो. अण्णासाहेब शिंदे यांच्यासारख्या कृषिमंत्र्याच्या दूरदृष्टीमुळे सिंचन, संकरित बियाणे आणि रासायनिक खतांच्या जोरावर देशाने अन्नधान्यांसह इतर शेती उत्पादनात दरवर्षी नवनवे विक्रम केले. कमी पाऊस किंवा दुष्काळासारख्या स्थितीचे अपवाद सोडल्यास देशात अन्नधान्यांसह शेतीमालाच्या उत्पादनाचा वाढीचा कल कायम राहिला, हे खरे असले, तरी वाढत्या लोकसंख्येसाठी शेतीमालाचे अधिक उत्पादन घेण्यासाठी सिंचनाच्या पुरेशा व्यवस्था निर्माण करता आल्या नाहीत. त्यामुळे केवळ मोसमी पावसावर अवलंबून शेती करणाऱ्या या देशात बारमाही पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही. अशाही अवस्थेत शेतकऱ्यांनी विक्रमी उत्पादन करणे ही बाब महत्त्वाची मानायला हवी. अन्नधान्याच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात स्वयंपूर्णता प्राप्त करण्यासाठी गेल्या पाच दशकांत जे प्रयत्न झाले, त्याचे हे फळ आहे. तरीही, अन्नधान्य उत्पादनाचा लाभ शेवटच्या नागरिकापर्यंत पोहोचवण्यात फार मोठे यश मिळत नसल्याचे चित्र फारसे आशादायक नाही.

जगात सर्वाधिक प्रमाणात डाळींचा आणि खाद्यतेलाचा वापर करणाऱ्या देशात भारत नेहमीच अग्रेसर आहे. तरीही येथे त्याचे अतिशय अपुरे उत्पादन होते. सुमारे ८५ टक्के खाद्यतेल भारताला आयात करावे लागते. डाळींच्याही आयातीला पर्याय उरत नाही. यंदा जगातील एकूण सुमारे ७८३.८ दशलक्ष टन गव्हाच्या उत्पादनापैकी भारताचा वाटा ११२.७ दशलक्ष टन इतका आहे. जगाचे तांदूळ उत्पादन सुमारे ५०२.९८ दशलक्ष टन आहे, त्यामध्ये देशाचा वाटा १३५.५ दशलक्ष टन इतका आहे. मोसमी पावसाचा थेट परिणाम पिकांच्या लागवडीवर होताना दिसतो. सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला की, उत्पादनही सरासरीपेक्षा जास्त झाल्याचे दिसून येते, याचाच अर्थ आपली शेती आजही मोसमी पावसावर अवलंबून आहे. गेल्या पाच वर्षांचा विचार करता देशात गेल्या पाच वर्षांत मोसमी पाऊस चांगला झाला. २०१८ मध्ये हवामान विभागाने ९७ टक्के पावसाचा अंदाज व्यक्त केला होता. प्रत्यक्षात ९१ टक्के म्हणजे सरासरीपेक्षा कमी झाला होता. त्या वर्षी एकूण अन्नधान्य उत्पादन २८५.२ दशलक्ष टन झाले होते.

# लीड सुपर १०० विद्यार्थ्यांची कामगिरी ९५ टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्यांच्या सीबीएसईच्या सरासरीहून १० पटींनी चांगली

अहमदनगर, २३ मे २०२३: लीड (डएऊ) या भारतातील सर्वांत मोठा स्कूल एडटेक कंपनीच्या २०२३ सालातील इयत्ता १०वीच्या बॅचने सीबीएसई बोर्डाच्या परीक्षेत शैक्षणिक उत्कृष्टतेचा सर्वोच्च स्तर गाठला असून त्यायोगे त्यांच्या शाळांसाठी नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. भारतातील छोट्या शहरांतील गुणवान विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण व मार्गदर्शन देणाऱ्या लीड सुपर १०० या कार्यक्रमातील २० टक्क्यांहून अधिक विद्यार्थ्यांनी ९५ टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त केले आहेत. सीबीएसई शाळांमधील एकूण विद्यार्थ्यांमध्ये ९५ टक्क्यांहून अधिक गुण मिळवण्याचे प्रमाण केवळ २ टक्के आहे.

लीड सहयोगी शाळांमधील सर्वोच्च गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये, किंग्स किंग्डम अकॅडमी, सोनाई, अहमदनगर या शाळेमधील जान्हवी विवेक चंदक हिचा समावेश आहे, जिला ९६.२ टक्के गुण मिळाले, तसेच रशीनकर ओम गणपत आणि पत्वा आयुषी अतुलकुमार यांना अनुक्रमे ९५.५० टक्के गुण मिळाले. तसेच महाराष्ट्रातील कटफळ येथील झैनबिया इंग्लिश मीडियम स्कूलमधील संस्कृती युवराज शिंदेने ९८.६ टक्के गुण मिळवले आहेत. ओडिशातील केओंझार येथील श्री गुरूकुल इंग्लिश मीडियम स्कूलच्या बिद्या प्रियदर्शिनी संती हिने ९८.२ टक्के गुण प्राप्त केले आहेत.

लीड सहयोगी शाळांच्या व्यापक समूहातही ९२ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त केले आहेत. छोट्या शहरांतील तसेच लीड सेवा देत असलेल्या परवडण्याजोगे शिक्षणशुल्क आकारणाऱ्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या क्षमतांवर यामुळे शिक्कामोर्तब झाले आहे. या विद्यार्थ्यांना जेव्हा उत्कृष्ट शिक्षणाची संधी दिली गेली. तेव्हा त्यांनी भारतातील महानगरांतील व भलीमोठी फी आकारणाऱ्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या तोडीची कामगिरी केली आहे.

महाराष्ट्रातील माणगाव, कुर्डुवाडी, करमाळा आणि अक्कलकोट येथील लीड शाळांतील विद्यार्थ्यांनीही उत्कृष्ट कामगिरी केली आहे. अक्कलकोटच्या लीड शाळेतील निजगुण मल्लिकार्जुन गद्दाड याने ९६.४ टक्के गुण प्राप्त केले आहेत; करमाळ्यातील लीड शाळेतील स्पर्श मुकेश गरियाने ९६.४ टक्के गुण प्राप्त केले आहेत; अक्कलकोटमधील लीड शाळेतील भूमिका बसवरजा डोंगरीतोटने ९५.२ टक्के गुण प्राप्त केले आहेत. लीड शाळेतील दर चारपैकी एका विद्यार्थ्याने ९० टक्क्याहून अधिक गुण मिळवले आहेत.

लीडचे सहसंस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुमीत मेहता म्हणाले, २०२३ सालात शालेय शिक्षण पूर्ण करणाऱ्या लीड सीबीएसई १०वी विद्यार्थ्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो! योग्य शालेय एडटेक प्रणालीमुळे भारतभरातील छोट्या शहरांतील विद्यार्थी महानगरे व मोठ्या शहरांतील विद्यार्थ्यांच्या तोडीची कामगिरी करू शकतात हे या विद्यार्थ्यांनी अध्ययनात केलेली प्रगती आणि त्यांचे शैक्षणिक यश यातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. त्यांच्या अविश्वसनीय यशात हातभार लावता आला याचा आम्हाला आनंद वाटतो. विद्यार्थ्यांना यशाची नवीन शिखरे पादाक्रांत करण्याची क्षमता देण्यासाठी आम्ही समर्पितपणे काम करत राहू.

हे असामान्य शैक्षणिक यश म्हणजे लीडच्या एकात्मिक शालेय एडटेक प्रणालीच्या प्रभावीपणाची पावती आहे. ही प्रणाली विषयांच्या संकल्पनात्मक आकलनाला प्राधान्य देते आणि संवाद, सहयोग व वस्तुनिष्ठ विचार या २१व्या शतकातील महत्त्वपूर्ण कौशल्यांचा पाया घालून देते. लीडचा एनईपी–संलग्न बहुमार्गीय अभ्यासक्रम हा आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्तम पद्धती व संशोधनाच्या पायावर उभा आहे आणि विद्यार्थ्यांमधील सुधारणेच्या आवश्यकता ओळखण्यासाठी व व्यक्तीनुरूप अध्ययनासाठी नवोन्मेषकारी तंत्रज्ञानाचा उपयोग करतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास व कामगिरी दोन्हींना उत्तेजन मिळते.

सोनाई, अहमदनगर येथील किंग्स किंग्डम अकॅडमीची विद्यार्थिनी जान्हवी विवेक चंदक म्हणाली, प्रत्येक विद्यार्थ्यासाठी एक महत्त्वाचा शैक्षणिक टप्पा असलेल्या सीबीएसईच्या १०वी इयत्तेच्या परिक्षेत एवढे चांगले गुण मिळवले याचा मला आनंद वाटतो. माझ्या शाळेतील शिक्षक, माझे आईवडील आणि लीड यांच्या पाठिंब्याशिवाय तसेच मार्गदर्शनाशिवाय हे यश शक्य झाले नसते. लीडचा अभ्यासक्रम व वर्गात शिकवण्याच्या पद्धतींमुळे मला संकल्पना व विषय अधिक चांगल्या रितीने समजून घेण्यात मदत झाली आणि माझा शैक्षणिक प्रवासच यामुळे पालटून गेला.

सोनाई, अहमदनगर येथील किंग्स किंग्डम अकॅडमीच्या मुख्याध्यापिका श्रीमती किर्ती बांग म्हणाल्या, आम्हाला जान्हवी, रशीनकर आणि पत्वा यांनी सीबीएसईच्या १०वी परिक्षेत केलेल्या उत्तम कामगिरीचा अत्यंत अभिमान वाटतो. हा लक्षणीय निकाल त्यांच्या परिश्रमांची व निर्धाराला तसेच लीडने दिलेल्या सर्वसमावेशक शैक्षणिक सहाय्याला मिळालेली पावती आहे. लीडच्या कठोर इयत्ता १०वी प्रणालीमध्ये सखोल सराव आणि वेळेवर केल्या जाणाऱ्या सुधारणांचा समावेश आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची सर्व विषयांतील संकल्पनात्मक स्पष्टता सुधारण्यात मदत झाली आहे. लीड भारतभरातील शाळांमध्ये प्रगत सीबीएसई अभ्यासक्रम देऊ करते. तसेच कर्नाटक, तमीळनाडू, तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि राजस्थान या राज्यांतील राज्य शिक्षण मंडळांशी संलग्न शाळांनाही अभ्यासक्रम देऊ करते. लीडचा अभ्यासक्रम संबंधित मंडळांनी घालून दिलेल्या नवीनतम मार्गदर्शक तत्त्वांशी पूर्णपणे संलग्न असतो आणि प्रत्येक मुलाचे शिक्षण खऱ्या अर्थाने सर्वांगीण होईल आणि त्यांची राष्ट्रीय स्तराशी ओळख होईल याची खात्री या अभ्यासक्रमाद्वारे केली जाते.

************

# काँग्रेसकडून लोकसभेच्या सर्वच जागांची चाचपणी, कारण काय?

**नागपूर :** लोकसभा निवडणुकीला अवघे काही महिने बाकी आहेत. त्यामुळे या निवडणुकीची सर्वच राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. बैठका, मिटिंगा आणि आढावा यावर सर्वच राजकीय पक्षङांनी भर दिला आहे. महाविकास आघाडीने तर वज्रमूठ सभा घेऊन धुराळाच उडवून दिला आहे. लोकसभा निवडणुकीच्या जागा वाटपा संदर्भात महाविकास आघाडीची बैठकही झाली आहे. आघाडीतील तिन्ही पक्षाचे प्रत्येकी दोन दोन नेते जागा वाटपाबाबत सखोल चर्चा करणार आहेत. असं असतानाच एक वेगळी बातमी येऊन धडकली आहे. काँग्रेस राज्यातील लोकसभेच्या सर्वच्या सर्व म्हणजे ४८ जागांची चाचपणी करणार आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत नेमकं चाललंय काय? असा सवाल केला जात आहे.

राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघात काँग्रेसची चाचपणी होणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी काँग्रेसची २ आणि ३ जून रोजी मुंबईत बैठक होणार आहे. सर्व लोकसभा मतदारसंघात उमेदवारांच्या चाचपणीसाठी काँग्रेसची ही बैठक होत आहे. राष्ट्रवादी आणि ठाकरे गटाकडे असलेल्या मतदारसंघातंही काँग्रेसची चाचपणी होणार आहे. या चाचपणीच्या आधारेच काँग्रेस महाविकास आघाडीत जागा मागणार असल्याचं सांगितलं जात आहे.

**आमदार, जिल्हाध्यक्ष उपस्थित राहणार**



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी ही महत्त्वपूर्ण बैठक बोलावली आहे. राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या चाचपणीसाठी काँग्रेसची ही बैठक होत आहे. लोकसभा मतदारसंघातील जिल्हाध्यक्ष, आमदार, प्रमुख नेत्यांना या बैठकीसाठी आमंत्रण देण्यात आलं आहे. या नेत्यांकडून आढावा घेतला जाणार आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, अशोक चव्हाण या बैठकीला उपस्थित राहणार आहेत.

**रिपोर्ट तयार करणार** – या बैठकीत प्रत्येक मतदारसंघाचा आढावा घेतला जाणार आहे. काँग्रेसची कोणत्या मतदारसंघात किती ताकद आहे याची चाचपणी केली जाणार आहे. तसेच किती मतदारसंघात काँग्रेसचे किती प्रबळ उमेदवार आहेत याचीही माहिती घेतली जाणार आहे. त्याचा एक विस्तृत रिपोर्ट तयार केला जाणार असून या रिपोर्टनुसारच काँग्रेस जागांची मागणी करणार असल्याचंही सांगितलं जात आहे.

**पक्षांतर्गत फेरबदल होणार** – दरम्यान लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी राज्यातील काँग्रेस पक्षात दिल्लीस्तरावर हालचाली सुरू आहेत. काँग्रेसमध्ये मोठे फेरबदल होणार असल्याची माहिती मिळत आहे. दोन दिवसांपूर्वी राज्यातील काही नेत्यांनी दिल्लीत जाऊन वरिष्ठ नेत्यांच्या गाठीभेटी घेतल्याने हालचाली वाढल्या आहेत. प्रदेश काँग्रेसच्या सध्याच्या रचनेत काही महत्त्वपूर्ण फेरबदल करून प्रमुख नेत्यांवर पक्षाच्या नव्या जबाबदाऱ्या दिल्या जाण्याची दाट शक्यता.

**आज दिल्लीत बैठक** – राज्यातील विधान परिषदेच्या निवडणुकीनंतर अंतर्गत कलहावर पक्ष श्रेष्ठी नाराज असल्याची माहिती आहे. पक्षात वरिष्ठ नेत्यांमध्येच एकोपा नाही, अशी राज्यातील नेत्यांची राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्षांकडे तक्रार आहे. याबाबत आज दिल्लीत प्रमुख नेत्यांमध्ये बैठक होणार असल्याची माहिती आहे.

## काँग्रेसचे चंद्रपूरचे खासदार व्हेंटिलेटरवर



**चंद्रपूर :** राज्यातील काँग्रेसचे एकमेव खासदार बाळू धानोरकर यांची तब्येत बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दिल्ली येथील रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले आहे. त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले असले तरी त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचं डॉक्टरांनी म्हटलं आहे. तसेच धानोरकर हे उपचाराला प्रतिसाद देत असून कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका, असं आवाहन धानोरकर यांच्या कुटुंबीयांनी केलं आहे. चंद्रपूरचे काँग्रेस खासदार बाळू धानोरकर दिल्लीच्या वेदांता रुग्णालयात उपचार घेत आहेत. दोन दिवसांपूर्वी किडनी स्टोनच्या शस्त्रक्रियेसाठी ते नागपुरात खासगी इस्पितळात दाखल झाले होते. शस्त्रक्रियेनंतर गुंतागुंत झाल्यावर त्यांना एअर म्बुलन्सद्वारे दिल्लीत हलविण्यात आले. त्यांच्या आतड्यांवर सूज असल्याची प्राथमिक माहिती असून त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आहे. खासदार धानोरकर उपचारांना प्रतिसाद देत आहेत. त्यांची पत्नी आणि वरोरा विधानसभा मतदारसंघातील आमदार प्रतिभा धानोरकर यांच्यासह दोन्ही मुले देखील दिल्लीत आहेत. खासदार धानोरकर यांचे निकटवर्तीय दिल्लीत दाखल झाले आहेत.

# पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारा

## –राजेंद्र दाते पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी–

**मुंबई** – उभारण्याचे निर्देश नगरविकास विभाग मंत्रालय यांना होणे बाबत मनपा औरंगाबाद.मधील रस्त्यांची उंची वाढल्यामुळे नागरिकांना पावसाळ्यात मोठ्या त्रास सहन करावा लागत असून स्मार्ट सिटीच्या माध्यमातून तयार करण्यात येणाऱ्या सिमेंट रस्त्यामुळे जमिनी पासुन एक फुटा पेक्षा जास्त उंच होणाऱ्या रस्त्यामुळे आणि या बाबत मनपा कडे या साठी अद्याप कुठलेही नियोजन अथवा व्यवस्थापन नसल्या मुळे आजूबाजूला राहणाऱ्या नागरिकांच्या घरांमध्ये पाणी जाऊन ते साचत आहे म्हणून पावसाचे पाणी वाहून जाण्या साठी स्व:तंत्र यंत्रणा उभारा अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कडे शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक आणि पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव राजेंद्र दाते पाटील यांनी केली आहे.

पुढे त्यांनी आपल्या सविस्तर निवेदनात नमूद केले आहे की,असाच प्रकार पावसाचे पाणी स्मार्ट आपत्ती व्यवस्थापन नसल्यामुळें शहरातून वाहणाऱ्या खामनदीच्या परिसरात राहणाऱ्या नागरी.वसाहतीं मध्येही पावसाचे पाणी नेहमी शिरत असते. शहरात नव्याने तयार होणाऱ्या सिमेंटचे रस्ते तयार करताना पावसाच्या पाण्याचा निचरा व्हावा याचा काही एक विचार किवा या दृष्टीने कोणत्याही प्रकारच्या उपाय योजना मनपा अथवा स्मार्ट सिटी च्या वतीने केलेल्या नाहीत.



विशेष बाब औरंगाबाद शहरातील विविध ठिकाणी नाला रिटेनिंग वॉल पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी व्यवस्थापनच महापालिकेने अद्याप केलेले नाही. त्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी महानगर पालीका औरंगाबाद यांनी स्वतंत्र यंत्रणाच उभारलेली नाही आणि याच मुळे उंच करण्यात येत असलेल्या रस्त्यावर 'स्ट्रॉर्म वॉटर ड्रेन' बांधण्यात आलेली नसल्याची ही महत्त्वाची बाब आम्ही सातत्याने तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक आणि स्मार्ट सिटी सी ई ओ तथा त्यांचे अधिकारी कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन दिलेला असताना देखील डेप्युटी सी.ई. ओ. तथा त्यांचे अधिकारी कर्मचारी नागरीकांना भेटण्यास सुध्दा वेळ उपलब्ध करून देत नसल्याची बाब दुर्दैवी आहे.

**मुख्यमंत्र्याकडे प्रमुख मागण्या**

मनपाच्या आपत्ती व्यवस्थापन, विभाग रिशफल करण्यात यावा. रस्त्यावर 'स्ट्रॉर्म वॉटर ड्रेन' बांधण्यात येण्याच्या आदेश व्हावेत. महानगर पालिका औरंगाबाद क्षेत्रात (स्ट्रॉम वॉटर ड्रेन) पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी स्व:तंत्र यंत्रणा उभारण्याचे निर्देश नगरविकास विभाग मंत्रालय यांना व्हावेत. नागरीकांना अजीबात वेळ न देणाऱ्या डेप्युटी सी.ई.ओ. तथा सिमेंट रस्त्याशी संबंधित अधिकारी कर्मचारी यांना तात्काळ बदलण्याचे निर्दे श व्हावेत. स्ट्रॉर्म वॉटरड्रेन बांधण्यासाठी तातडीने डीपीआर करण्याचे निर्देश नगरविकास विभाग मंत्रालय यांना होणे. महापालिकेच्या झोन ७ व ८ मधील आणि खामनदीतील विविध ठिकाणी पावसाचे पाणी शिरतअसलेल्या भागात तात्काळ उपाययोजना होण्यासाठी आवश्यक त्या सर्व ठिकाणी नाला रिटेनिंग वॉल बांधणे व स्ट्रॉर्म वॉटर ड्रेन व्यवस्था निर्माण करण्याचे निर्देश तत्काळ होणे. या साठी आवश्यक तो डिटेल्ड प्रॉजेक्ट रिपोर्ट तयार करण्याचे निर्देश नगरविकास विभाग मंत्रा लयास होउन किमान १०० कोटींचा विशेष निधी मंजुर करावा अशी मागणी करून अति तात्काळ निर्देश नगरविकास विभाग मंत्रालय यांना होऊन नागरीकांना न्याय द्यावा अशी नम्र विनंती शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक आणि पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव राजेंद्र दाते पाटील यांनी केली आहे.



# मासे पकडण्यासाठी गेले आणि सापडला हा 'खजिना!'



**वॉशिंग्टन :** कधी कधी रस्त्यावर मालवाहतूक करणारे ट्रक किंवा टँकर अपघातग्रस्त होऊन उलटून पडत असतात. त्यामुळे रस्त्यांवर चॉकलेटपासून ते तेल, मासे व अन्यही काही खाद्यपदार्थांचा पूर आलेली अनेक उदाहरणे आहेत. आता असाच एक प्रकार अमेरिकेतही घडला आहे. तिथे काही मच्छीमार नदीत मासेमारीसाठी गेले होते. पण तिथे त्यांच्या हाती अशी गोष्ट लागली, ज्याची त्यांनी कधी कल्पनाही केली नसेल. त्यांच्यासमोर शेकडो बीअरच्या बाटल्यांचा खच होता. या बीअरच्या बाटल्या पाण्यात तरंगत होत्या. या बाटल्याही अशाच अपघातामुळे नदीत पडल्या होत्या!

इतक्या बीअरच्या बाटल्या पाहून मच्छीमारांचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्यांनी मासेमारी सोडून या बाटल्या गोळा करण्यास सुरुवात केली. हे प्रकरण अमेरिकेतील मोंटाना राज्याशी संबंधित आहे. तीन मच्छीमार एका बोटीतून मोंटाना नदीत मासेमारी करण्यासाठी गेले होते. मात्र, याच दरम्यान नदीजवळ बांधलेल्या १०० वर्षे जुन्या बोगद्यामधून जाणारी मालगाडी रुळावरून घसरली आणि अपघात झाला. मालगाडीचे ७ डबे रुळावरून घसरले. अपघातानंतर कॅनमध्ये भरलेले बीअरचे बॉक्स नदीत पडले. मच्छीमार पोहोचले तेव्हा हे दृश्य पाहून ते आश्चर्यचकित झाले. पाण्यात सर्वत्र बीअरच्या बाटल्या तरंगत होत्या. आता या अपघाताचे फोटो सोशल मीडियावरही व्हायरल होत आहेत.


एका फोटोमध्ये नावेत तीन लोक दिसत आहेत. त्यांच्या हातात रुडर असून, आजूबाजूला बीअरचे बॉक्स पसरलेले दिसत आहेत. या अपघातात कोणीही जखमी झालेले नाही, ही समाधानाची बाब आहे. या प्रकरणाबाबत बचाव पथकाच्या अधिकाऱ्याने सांगितले की, मालगाडीचे सात डबे बोगद्यात रुळावरून घसरले. ट्रॅक साफ करण्यास वेळ लागू शकतो. सध्या नदीत तरंगणाऱ्या बीअरच्या बाटल्या गोळा करण्याचे काम सुरू आहे. मालगाडी रुळावरून घसरण्याच्या कारणाचा शोध घेतला जात आहे.

# पृथ्वीच्या दिशेने येत आहे १५० फुटी लघुग्रह



**वॉशिंग्टन :** पृथ्वीजवळून वेळोवेळी अनेक लघुग्रह जात असतात. आता १५० फुटांचा एक लघुग्रह पृथ्वीच्या दिशेने वेगाने येत असल्याचे 'नासा'ने म्हटले आहे. या लघुग्रहाला '२०२३ एफझेड ३' असे नाव देण्यात आले असून, तो ६ एप्रिलला पृथ्वीच्या जवळ येऊ शकतो. एखाद्या मोठ्या विमानाच्या आकाराचा हा लघुग्रह असल्याचे सांगितले जात आहे. हा लघुग्रह ताशी ६७,६५६ किमी वेगाने पृथ्वीकडे सरकत आहे. जवळपास ४१,९०,००० किमी अंतरावरून तो पुढे निघून जाईल. 'नासा'ने आपल्या अहवालात म्हटले आहे की, या लघुग्रहामुळे पृथ्वीला धोका नाही. लघुग्रह '२०२३ एफझेड ३' व्यतिरिक्त '२०२३ एफयू ६', '२०२३ एफएस ११', '२०२३ एफए ७' आणि लघुग्रह '२०२३ एफक्यू ७' येत्या काही दिवसांत पृथ्वीजवळून जातील. पृथ्वीच्या तुलनेने जवळ येण्याची अपेक्षा असलेले धूमकेतू आणि लघुग्रह 'नासा'च्या ॲस्टेरॉईड वॉच डॅश बोर्डद्वारे ट्रॅक केले जातात. डॅश बोर्डमध्ये लघुग्रहाच्या पृथ्वीच्या सर्वात जवळ येण्याची तारीख, सापेक्ष आकार, पृथ्वीपासूनचे अंतर आणि अंदाजे व्यास सांगितला जातो. विविध आकारांचे सुमारे ३०,००० लघुग्रह, ज्यापैकी ८५० पेक्षा अधिक एक किलोमीटरपेक्षा जास्त रुंद आहेत. पृथ्वीच्या आसपासच्या भागात कॅटलॉग केले गेले आहेत, त्यांना 'पृथ्वीजवळील वस्तू' (नियर अर्थ ऑब्जेक्टस) असे नाव दिले आहे. पुढील १०० वर्षांत पृथ्वीला यामुळे कोणताच धोका नसल्याचे सांगण्यात आले आहे.

# पायांनी तिरंदाजी!



**लंडन :** तिरंदाजी करणे हे एक मोठेच कौशल्याचे काम आहे. मात्र जिम्नॅस्टिक्स आणि तिरंदाजी या दोन्ही खेळांचे कौशल्य एकत्रच दाखवणे हे तर त्याहीपेक्षा कठीण काम आहे. एक महिला खेळाडू या दोन्ही गोष्टी अगदी लीलया करते. ती चक्क पायांनी धनुष्यबाण धरून अचूक निशाणा साधू शकते. तिचा एक व्हिडीओ आता व्हायरल होत आहे. जिम्नॅस्टिक्सच्या खेळाडूंना शरीर लवचीक ठेवणे आवश्यक असते. त्यामुळे सरावाच्या वेळी त्यांना प्रचंड मेहनत घ्यावी लागते. सध्या अशाच महिला जिम्नॅस्टिक खेळाडूचा व्हिडीओ ट्विटरवर आला आणि आता तो व्हायरल होत आहे. यामध्ये तिने तिचे धनुर्विद्येचे कौशल्य दाखवत अचूक नेम मारला आहे. आतापर्यंत तुम्ही तिरंदाजी पाहिली, त्यात खेळाडू हातात धनुष्यबाण धरून अचूक निशाणा लावण्याचा प्रयत्न करतात. मात्र, या व्हिडीओमधील मुलीने खाली डोके आणि वर पाय अशा पद्धतीत उभे राहून पायाच्या बोटांत बाण आणि धनुष्य धरलेला दिसतो आहे. तसेच या बाणाच्या टोकाला आगही लावलेली आहे. इतक्या कठीण पद्धतीने केलेली अचूक तिरंदाजी पाहून सर्व यूजर्स थक्क झाले आहेत. मात्र हा अचूक निशाणा लागण्यासाठी तिने प्रचंड मेहनत घेतली असून, चक्क १७ वर्षे कठोर प्रशिक्षण पूर्ण केले आहे. यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. या व्हिडीओला आतापर्यंत ५ मिलियनहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. शानेन नावाच्या या तरुणीने वयाच्या सहाव्या वर्षापासून जिम्नॅस्टिक्सचा सराव सुरू केला होता.


# दीर्घायुष्याबरोबरच कार्यक्षमता वाढल्याने निवृत्तीचे वयही बदलावे?

**न्यूयॉर्क :** जगभरातील लोकांचे आयुर्मान सध्या वाढलेले आहे. त्याचबरोबर लोकांची अगदी उतारवयापर्यंत काम करण्याची क्षमताही वाढली असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळे निवृत्तीचे वयही बदलले पाहिजे, असे म्हटले जात आहे. ज्ञानाधारित क्षेत्रात निवृत्तीचे वय ७० वर्षे केले पाहिजे, असे अनेकांचे म्हणणे आहे.

सेवानिवृत्तीचे वय वाढवावे की नाही, यावरून सध्या जगभरात वाद सुरू आहेत. अमेरिकेत सरासरी आयुर्मान १६ वर्षांनी वाढले आहे. येथे ते ७६ वर्षे मानले आहे. अनेक देशांत ते ८२ वर्षांपर्यंत आहे.आरोग्य विषयाचे तज्ज्ञ म्हणतात, आयुर्मानाऐवजी आरोग्याच्या बाबतीत वयासोबत होणारे बदल बघितले पाहिजेत. म्हणजे जितकी वर्षे लोक निरोगी असतात तितक्या वर्षांना सक्रिय आयुष्य जगण्यालायक वय मानले पाहिजे. बोस्टन कॉलेजमधील



सेंटर फॉर रिटायरमेंट रिसर्चचे सिनिअर रिसर्च इकोनॉमिस्ट गॅल वेटस्टीन यांनी कार्यरत आयुर्मानावर संशोधन केले. यात जे अमेरिकन ५० वर्षे वयामध्ये निरोगी आहेत; ते २३ वर्षे आणखी निरोगी राहून काम करण्याची अपेक्षा बाळगतात, असे आढळले. या हिशेबाने सरासरी कार्यरत आयुर्मान ७३ वर्षे झाले. डॉ. वेटस्टीन म्हणतात, 'आयुर्मानासोबत काम करण्याची क्षमताही वाढली आहे. २०२० मध्ये सुमारे ४५ टक्के अमेरिकन हे वर्कफोर्स मॅनेजमेंट, बिझनेस, वित्त, शिक्षण व आरोग्यासारख्या ज्ञानाधारित क्षेत्रांत होते.' १९३५ मध्ये अशा प्रकारच्या व्यवसायांत मनुष्यबळाचा केवळ ६ टक्के वाटा होता. दक्षिण कॅलिफोर्निया विद्यापीठाचे जेरॅटोलॉजी एक्स्पर्ट डॉ. पिंचस कोहेन म्हणतात, 'आरोग्याच्या दृष्टीने या क्षेत्रात ६५ वर्षांपेक्षा कमी वयातील निवृत्तीला कोणताच अर्थ नाही. केवळ शारीरिक श्रम असलेल्या क्षेत्रांमध्ये ते योग्य ठरवले जाऊ शकते.' जॉर्जिया विद्यापीठातील जेरॅटोलॉजी इन्स्टिट्यूटच्या संचालिका लीजा रेंजी हेमंड सांगतात, 'ज्ञानाधारित क्षेत्रांत ७० वर्षे वयामध्ये निवृत्ती ही संज्ञानात्मक दृष्टीनेही योग्य आहे.'



हे आहे रोमानियामधील विड्रारू धरण. अर्गेस नदीवरील हे धरण १९६६ मध्ये बांधून पूर्ण झाले. हे धरण १६६ मीटर उंच असून, त्याची कमान ३०५ मीटर लांबीची आहे.

# ओराचा रिटेलमध्ये ठसा, पहिले स्टोअर लॉन्च

**नाशिक :** हिऱ्यांच्या दागिन्यांसाठी भारतातील आघाडीचा, विश्वासार्ह ब्रँड ओरा ने विस्तार केला आहे. भारतातील ७५वे आणि नाशिकमधील पहिले स्टोअर सुरू केले. महाराष्ट्रातील हे २३ वे स्टोअर आहे. ३१०१ चौरस फूट क्षेत्रफळात पसरलेले, नाशिकमधील नवीन ओरा स्टोअर अभिनेत्री सई ताम्हणकर यांच्या हस्ते सेसिल डी सांता मारिया, ओरा फाईन ज्वेलरी येथे प्रमुख कार्यकारी अधिकारी यांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. शोरूममध्ये अत्याधुनिक हिऱ्यांचे दागिने असतील संग्रह ओरा चे पेटंट घेतलेला ७३ पैलूंचा हिरा ओरा क्राउन स्टार, भारतातील सर्वात तेजस्वी हिरा देखील नवीन रिटेल शोरूममध्ये उपलब्ध असेल.

स्टोअर लॉन्च बद्दल बोलताना, दिपू मेहता, व्यवस्थापकीय संचालक, ओरा म्हणाले, आम्ही शरणपूर रोड येथे नाशिकमधील पहिले ओरा स्टोअर सुरू करण्यासाठी उत्साहित आहोत. नाशिक हे समृद्ध सांस्कृतिक वारसा असलेले शहर आहे आणि आम्ही ओरा चे कलाकुसर केलेले उत्कृष्ट हिऱ्यांचे दागिने ग्राहकांसाठी आणण्यास उत्सुक आहोत आमचा विश्वास आहे की आमची विस्तृत श्रेणी आणि डिझाइन अपवादात्मक असून नाशिकच्या समजूतदार ग्राहकांना ग्राहक सेवेचा चांगला प्रतिसाद मिळेल. हे स्टोअर आमच्या इतर सर्व स्टोअर्सप्रमाणेच ओरा ची अनुकरणीय सेवा आणि विस्तृत ऑफरची दीर्घकालीन सेवा पुरवेल.



आरामदायक आसन आणि नवीन पद्धतीच्या वस्तूंसह स्टोअरची रचना रचनात्मकपणे केली असून ग्राहकाचा खरेदी अनुभव वाढवेल. नवीन शोरूममध्ये ब्रँडची डायमंड ज्वेलरीची मोठी श्रेणी समाविष्ट असून यात ओरा क्राउन स्टार कलेक्शन, एस्ट्रा कलेक्शन, डिझायर्ड कलेक्शन आणि प्लॅटिनम कलेक्शन समाविष्ट आहे.

ओरा सतत हिऱ्याच्या दागिन्यांमध्ये नवीन पद्धती आणून वधू आणि समकालीन दागिन्यांची विस्तृत श्रेणी ऑफर करत आहे. ५ जागतिक डिझाइन केंद्रांसह टोकियो, हाँगकाँग, अँटवर्प, मुंबई आणि न्यूयॉर्क, ओरा ने ७०० वर्षांचा बेल्जियमचा कलाकुसरीचा वारसा चालवला आहे.

प्रख्यात ब्रँड आपल्या विश्वासू ग्राहकांना १००% प्रमाणित दागिने प्रदान करतात, जे पूरक विमा आणि खात्रीशीर मोफत आजीवन देखभाल सेवा देतात. जळ ब्रँडच्या सात दिवसांच्या रिटर्न पॉलिसी व्यतिरिक्त आजीवन एक्सचेंज आणि बायबॅक असलेले संरक्षक संघर्षमुक्त हिरे पुरवतात. लॉन्च सेलिब्रेशनचा एक भाग म्हणून, नवीन स्टोअरला भेट देणारे ग्राहकांना ओरा उद्घाटन सवलत आणि विशेष ऑफर देईल.

# राज्य शासनाच्या फ्लॅगशिप कार्यक्रमांची गतीने अंमलबजावणी करा - उपमुख्यमंत्री

**अहमदनगर (प्रतिनिधी)–** राज्यातील जनतेच्या हितासाठी राज्य शासनामार्फत अनेक महत्त्वाकांक्षी (फ्लॅगशिप )कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या सर्व कार्यक्रमांची प्रशासनाने गतीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात विविध योजनांच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.बैठकीस राज्याचे महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार सदाशिव लोखंडे, खासदार सुजय विखे–पाटील आमदार बबनराव पाचपुते, आमदार प्रा.राम शिंदे, आमदार श्रीमती मोनिकाताई राजळे, आमदार प्राजक्त तनपुरे, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्या टप्प्यात जिल्ह्याने ६५१ कोटी रुपये खर्च करत १ हजार ३५ गावांमधून ३२ हजार कामांद्वारे २ लक्ष ९८ हजार हेक्टर जमीन संरक्षित सिंचनाखाली आली आहे. या अभियानामुळे मोठ्या प्रमाणात उत्पादकता वाढून शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करण्यात यश मिळाले आहे. जलयुक्त शिवार अभियानाच्या टप्पा २ मध्ये जिल्ह्यातील २५७ गावांची निवड करण्यात आली आहे. टप्पा दोन मधील कामे करताना लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच अंतिम आराखडा तयार करावा. तसेच गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या योजनेमध्ये लोकसहभाग वाढवत कामांना अधिक गती देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये जिल्ह्याने उत्कृष्ट काम केल्याबद्दल प्रशासनाचे कौतुक करत उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, आता मोदी आवास योजना सुरू करण्यात येत आहे. या योजनेसह शबरी, रमाई, प्रधानमंत्री आवास योजना एकत्रित करून १० लाख घरे उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार जिल्ह्याने त्यांचे उद्दिष्ट वाढवून समाजातील सर्व घटकांना न्याय देऊन पात्र गरजूंना लाभ देण्यासाठी मोहीम राबवावी, असेही ते यावेळी म्हणाले.



सर्वसामान्यांना विविध दाखल्यांसाठी शासकीय कार्यालयात चकरा माराव्या लागू नयेत यासाठी 'शासन आपल्या दारी' उपक्रम राबविण्यात येत आहे. दोन महिन्यात जनतेपर्यंत मोठ्या प्रमाणात त्यांच्यासाठीच्या योजना पोहोचवायच्या असुन जिल्ह्याचे दीड लक्ष दाखले वाटपाचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

सौर कृषि वाहिन्यांचा पथदर्शी प्रकल्प सर्वप्रथम अहमदनगर जिल्ह्यात राबविण्यात आला आहे. कृषीवाहिन्या या शंभर टक्के सौर कृषि वाहिन्यांमध्ये करण्यासाठी जिल्ह्यात मोठा वाव आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेण्याचे आवाहन करत याद्वारे शेतीला दिवसा विनाव्यत्यय वीज देता येणार आहे. सरकारी जमिनी उपलब्ध नसणाऱ्या गावात शेतकऱ्यांच्या पडीक जमिनी भाडेतत्त्वावर घेतल्या जाणार आहेत. या जमिनीला महावितरणमार्फत प्रति एकर, प्रतिवर्ष ५० हजार रुपये भाडे दिले जाणार असल्याने मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजनेच्या अंमलबजावणीसाठी वेगाने कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. जिल्ह्यात नैसर्गिक आपत्तीमुळे............ (पान ७ वर)

नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीपोटीची रक्कम शासनाकडून देण्यात आली आहे. ही रक्कम येत्या १० दिवसांमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याचे निर्देशही जिल्हा प्रशासनाला यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलयुक्त शिवार अभियान २.०, मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व शहरी, जलजीवन मिशन, गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार, शासन आपल्या दारी, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना या योजनांसह नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचा व दिलेल्या मदतीचा आढावा घेतला.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, जिल्ह्यातील विकास कामांना समन्वयाद्वारे गती देण्यात येत असुन जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्या टप्प्यात झालेल्या कामांमुळे शाश्वत सिंचनाची निर्मिती झाली आहे. त्यामुळे नागरिक स्वत:हून या अभियानासाठी पुढे येत आहेत. दुसऱ्या टप्प्यातील कामेही वेगाने करण्यात येत आहेत. वाळू धोरणाची सुरुवात अहमदनगर जिल्ह्यात करण्यात आली असुन इतर जिल्ह्यातही या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी. जिल्ह्यातील तरुणांना रोजगार मिळुन औद्योगिक क्षेत्रात गुंतवणुकीसाठी आवश्यक ती मदत मिळावी, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

**३३ के व्ही. च्या चार उपकेंद्रांचा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाईन लोकार्पण**

जनतेला योग्य दाबाने व अखंडितपणे विजेचा पुरवठा व्हावा या दृष्टिकोनातून विद्युत विकासावर ही भर देण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून अहमदनगर जिल्ह्यातील चार ३३ के.व्ही. उपकेंद्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते ऑनलाईन लोकार्पण करण्यात आले. यामध्ये राहुरी तालुक्यातील खडांबे, कानडगाव, अकोले तालुक्यातील खीरविरे व जामखेड तालुक्यातील नायगाव या चार उपकेंद्रांचे लोकार्पण करण्यात आले. या चारही उपकेंद्राच्या माध्यमातून सुमारे ११ हजार ५०० नागरिकांना सुरळीत व अखंडितपणे वीजेचा पुरवठा होणार आहे.

**लोकसेवा आयोगामार्फत निवड झालेल्या विद्यार्थ्यांसह पालकांचा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव –** लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये अहमदनगर जिल्ह्यातील नऊ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले.

यामध्ये अभिषेक दुधाळ, मंगेश खिलारी, सागर खर्डे, डॉ. शुभांगी सुदर्शन केकान–पोटे, प्रशांत इंगळे, श्रुती कोकाटे, स्वप्निल डोंगरे, राजश्री देशमुख, महारुद्र भोर या विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

**शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत लाभार्थ्यांना लाभाचे वाटप –** शासन आपल्या दारी हा उपक्रम जिल्ह्यात अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात येत असून या उपक्रमांतर्गत विविध योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्राथमिक स्वरूपात लाभाचे वाटप करण्यात आले. तसेच कृषि यांत्रिकीकरणाच्या अभियानाच्या माध्यमातुन शेतकरी लाभार्थ्यांकना ट्रॅक्टर व औजारांचेही वाटप करण्यात आले.

# महाविकास आघाडीतील जागा वाटपाबाबत वार-पलटवार

**पुणे :** काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठा आणि लहान भाऊ कोण याबाबत जोरदार चर्चा रंगल्या असतानाच आता येऊ घातलेल्या पुणे लोकसभेच्या पोटनिवडणुकीबाबत काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी एक वक्तव्य केले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसकडूनही अजित पवार यांनी जशास तसे प्रत्युत्तर दिले आहे.



बाळासाहेब थोरात यांनी महाविकास आघाडीतील जागा वाटपावर भाष्य केले. पुणे लोकसभेची निवडणूक काँग्रेसच लढवेल, या थोरातांच्या वक्तव्यावर पुणे लोकसभेची जागा राष्ट्रवादी काँग्रेसच लढवेल, असे वक्तव्य अजित पवार यांनी केले आहे.

आज पुणे येथे पत्रकारांशी संवाद साधताना अजित पवार म्हणाले, पुणे लोकसभेची निवडणूक कोणत्या पक्षाने लढवायची, याचा अंतिम निर्णय महाविकास आघाडीतील ज्येष्ठ नेते चर्चा करून घेतील. मात्र, पुण्यात राष्ट्रवादीची ताकद अधिक असल्याने ही जागा राष्ट्रवादीने लढवावी, अशी आमची इच्छा आहे. बाळासाहेब थोरात म्हणत असतील ही जागा काँग्रेस लढवेल. तर, मीही ठामपणे सांगतो की, ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसच लढवेल. पुण्यात राष्ट्रवादीची ताकद जास्त आहे, असं म्हणत पवारांनी काँग्रेसच्या वर्मावर बोट ठेवले आहे.

महाविकास आघाडीच्या जागांचे वाटप करताना पुण्याची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला दिली गेली पाहिजे, असे मत अजित पवारांनी व्यक्त केले आहे. सद्यस्थितीनुसार पुण्यात राष्ट्रवादीचेच आमदार-खासदार अधिक आहेत. काँग्रेसकडे याआधीपासून ही जागा होती मात्र मात्र ती काँग्रेसला जिंकता आली नाही. अजित पवार म्हणाले, एखाद्या मतदारसंघात एखाद्या पक्षाची जागा निवडून येण्याची शक्यता कमी असेल आणि महाविकास आघाडीतील मित्रपक्षाची ताकद तिथे जास्त असेल तर ती जागा मित्र पक्षाला दिली गेली पाहिजे. दुसरीकडे जर अशी उलट परिस्थिती असेल, तेव्हाही असे घडलं पाहिजे. जागांची अदलाबदलही करायला हवी.

**पुणे लोकसभेवर काँग्रेसचाच हक्क वडेट्टीवार –** दरम्यान काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनीदेखील अजित पवारांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. खरं तर पुणे लोकसभेच्या जागेवर काँग्रेसचाच हक्क आहे. कसबा ही जागादेखील आम्ही किती वर्षांनी जिंकली? काँग्रेसची ताकद वाढली आहे असं मी म्हणत नाही. पण महाविकास आघाडी म्हणून लढायचं असेल तर आघाडीचा धर्म म्हणून आहे त्या जागेवर वाद घालण्यापेक्षा पुण्याची जागा काँग्रेसकडे होती, ती काँग्रेसकडे राहावी आणि काँग्रेसने लढावी असं मोठं मन सर्वांनी करुन सहकार्य करण्याची अपेक्षा आहे, असं ते म्हणाले.

या वार पलटवारांमुळे आता पुण्याची जागा महाविकास आघाडीतल्या नेमकी कोणत्या पक्षाला मिळणार, हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.






GM PLAZA
Lodging & Restaurant
Beside RTO Office, Railway Station Road, Aurangabad.
Email : mohsinmadani0@gmail.com


# मोदींना विरोध करणाऱ्यांना जनता जमालगोटा देणार-मुख्यमंत्री शिंदे

**नवी दिल्ली:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची यशस्वी कामगिरी पाहून पोटदूखी होणाऱ्या लोकांना जनता जमालगोटा देणार आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवीन संसद भवनाला विरोध करणाऱ्या विरोधकांना चपराक दिली आहे. दिल्लीतील महाराष्ट्र सदनात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंती निमित्त झालेल्या सोहळ्यात ते बोलत होते. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, तसेच भाजप व शिवसेनेचे खासदार उपस्थित होते.



ते म्हणाले, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जयंतीचे औचित्य साधून नरेंद्र मोदी यांनी नव्या संसद भवनाचे उद्घाटन केले आहे. अत्यंत रेकॉर्डब्रेक वेळेत संसदेचे काम पूर्ण झाले आहे. संपूर्ण देशवासियांना अभिमान वाटेल अशी ही वास्तू असून यामुळे लोकशाही अधिक बळकट आणि वृद्धींगत होणार आहे. देशाला ११ व्या क्रमांकावरुन ५ व्या क्रमांकावर नेणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कामगिरीला पाहुन पोटदुखी होणाऱ्या लोकांना जनता जमालगोटा देणार आहे असा टोला एकनाथ शिंदे यांनी लगावला.

**स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती महाराष्ट्र सदनात प्रथम –** यावेळी स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती दिल्लीतील महाराष्ट्र सदनात प्रथम साजरी होत असल्याची माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली. काही लोकांना सावरकरांचं वावडं आहे त्यामुळे त्यांनी या कार्यक्रमाला केलेला विरोध दुर्दैवी असल्याचं ते म्हणाले. घराणेशाहीत अडकलेल्या पक्षांकडून या कार्यक्रमात मिठाचा खडा टाकला जात आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.

स्वातंत्र्यवीर सावरकर भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीसाठी सशक्त क्रांतीचा पुरस्कार करणारे महान देशभक्त –मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे भारतीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी सशक्त क्रांतीचा पुरस्कार करणारे महान देशभक्त असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे काढले.

महाराष्ट्र सदन येथे आज स्वातंत्र्यवीर सावरकर यांची १४० वी जयंती साजरी करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपस्थित मान्यवरांनीही स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन केले. महाराष्ट्र शासनाकडून स्वातंत्र्यवीर सावरकरांची जयंती 'स्वातंत्र्यवीर गौरव दिन' म्हणून साजरी करण्यात येत आहे. शासनातर्फे नुकतीच याबाबतची घोषणा करण्यात आली होती. 'स्वातंत्र्यवीर गौरव दिना'च्या औचित्याने आज ठिकठिकाणी कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

यावेळी उपस्थित सर्व मान्यवर तसेच प्रसारमाध्यमांना संबोधित करताना मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, आज स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती पहिल्यांदाच महाराष्ट्र सदन येथे साजरी होत आहे, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची, गौरवाची तसेच आनंदाची बाब आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकताना मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे मोठे योगदान व त्याग आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर हे साहित्यिक तसेच समाजसुधारक होते. त्यांचे तैलचित्र संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात लावण्यात आले आहे. आज स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवीन संसद भवनाचे उद्घाटन होत आहे, ही सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. या नवीन वास्तूच्या माध्यमातून लोकशाही अधिक बळकट व वृद्धिंगत होईल, असा विश्वास व्यक्त करुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.

This Weekly Printed, Published and Owner by **Yunus Khan** Printed at Milestone Media, Railway Station, Aurangabad 431001 (MS) and Published At Lok Nisht 61, GM Plaza, Beside RTO Office, Railway Station Road, Aurangabad 431001 (MS) Editor - **Yunus Khan,** Mob.No. 9890190231 T.C.No. MAHMAR52309

हे वृत्तपत्र, मालक, मुद्रक, प्रकाशक **युनूस खान** यांनी माइलस्टोन मिडीया, रेल्वेस्टेशन रोड औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय लोक निष्ठ, ६१ जीएम प्लाझा आर.टी.ओ. ऑफीसच्या बाजुला, रेल्वेस्टेशन रोड औरंगाबाद-४३१००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.संपादक - **युनूस खान,** मो नं. 9890190231 T.C.No. MAHMAR52309